
दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ
बीड महाराष्ट्र | रविवार, 22 मार्च 2026 | अंक क्र. 302 | वर्षे 3 रे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4
Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com




# ट्रम्प यांचा इराणला 48 तासांचा अल्टिमेटम; होर्मुज सामुद्रधुनी खुली करा, अन्यथा ...



■ दिल्ली वृत्तसंस्था

अमेरिका, इस्त्रायल आणि इराण यांच्यातील तणाव आता अत्यंत गंभीर टप्प्यावर पोहोचला आहे. गेल्या तीन आठवड्यांपासून सुरू असलेल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला थेट ४८ तासांचा अल्टिमेटम दिला आहे. होर्मुज सामुद्रधुनी जहाजांच्या वाहतुकीसाठी तात्काळ खुली न केल्यास, अमेरिकन वायुसेना इराणच्या वीज प्रकल्पांवर हल्ले करून त्यांना उद्ध्वस्त करेल, असा थेट इशारा त्यांनी दिला आहे. विशेष म्हणजे, या कारवाईची सुरुवात इराणमधील सर्वात मोठ्या वीज प्रकल्पापासून केली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## नेमकं प्रकरण काय?

इराण-इस्रायल संघर्ष सुरू झाल्यापासून इराणने आपल्या सागरी हद्दीतील अत्यंत महत्त्वाचा मार्ग असलेली होर्मुज सामुद्रधुनी बंद ठेवली आहे. जगातील एकूण तेल पुरवठ्यापैकी सुमारे २० टक्के वाहतूक या मार्गावरून होते. त्यामुळे या मार्गावरील अडथळ्यांमुळे जागतिक बाजारात कच्च्या तेलाच्या किमती झपाट्याने वाढल्या आहेत. या पार्श्वभूमीवर ट्रम्प यांनी त्यांच्या ट्रुथ या सोशल प्लॅटफॉर्मवरून इराणला इशारा देत, "४८ तासांत मार्ग खुला करा, अन्यथा परिणामांना सामोरे जावे लागेल," असे स्पष्ट केले आहे.

## तेल दरांचा भडका उडण्याची शक्यता

इराणच्या भूमिकेमुळे जागतिक ऊर्जा बाजारावर मोठा दबाव निर्माण झाला आहे. अमेरिकेचे ट्रेझरी सेक्रेटरी स्कॉट बेसेन्ट यांच्या माहितीनुसार, परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी अमेरिकेने इराणी तेलावरील काही निर्बंध तात्पुरते शिथिल केले आहेत. यामुळे सुमारे १४ कोटी बॅरल तेल बाजारात येऊ शकते. मात्र, इराणने आपली भूमिका कायम ठेवली, तर लष्करी कारवाई अपरिहार्य ठरू शकते, असे संकेत अमेरिकेकडून देण्यात आले आहेत.

# प्रा.टी.पी. मुंडे यांनी दिल्या रमजान ईदच्या मुस्लिम बांधवांना शुभेच्छा!

## रमजान ईद हिंदू मुस्लिम ऐक्याचे प्रतीक!




■ परळी वैजनाथ प्रतिनिधी

हिंदू मुस्लिम ऐक्याचे प्रतीक असलेला रमजान ईद हा मुस्लिम बांधवांचा पवित्र सण संबंध देशभरामध्ये मोठ्या उत्साहात साजरा केला जातो त्याचे औचित्य साधून शिवसेनेचे नेते तथा बीड जिल्हा संपर्कप्रमुख प्रा.टी.पी.मुंडे (सर) यांच्या प्रमुख उपस्थिती त्यांनी मुस्लिम बांधवांना गळाभेट घेत ईदच्या शुभेच्छा दिल्या.

नेहरू चौक व मलकापूर येथील ईदगाह या ठिकाणी सकाळी शुभेच्छा देण्यासाठी पेंडल लावण्यात आला मुस्लिम बांधवांची नमाज पठण व धार्मिक विधी पूर्ण झाल्यानंतर त्यांनी गळाभेट घेत शुभेच्छा दिल्या. मुस्लिम बांधव आणि प्रा.टी.पी.मुंडे सर हे एक समीकरण गेल्या 30 वर्षापासून तयार झाले आहे. दरवर्षी मुस्लिम बांधवांना पवित्र रमजानच्या शुभेच्छा ते देत असतात या महिन्यात अतिशय कडक उन्हाळ्यात मुस्लिम बांधव अल्लाची उपासना करत महिनाभर रोजा (उपवास) करतात. मुस्लिम बांधवांच्या घरी जाऊन त्यांची भेट घेउन शुभेच्छा दिल्या आणि शीरखुर्मा चा आस्वाद बांधवांसोबत घेतला. हा स्नेहभाव गेल्या तीस वर्षापासून त्यांनी जपला आहे.

यावेळी महेश बँकेचे अध्यक्ष ओमप्रकाश सारडा, शिवसेनेचे नेते राजा भैय्या पांडे, सूर्यकांत मुंडे, प्रा.विजय मुंडे,शाम गडेकर, जिल्हा परिषद सदस्य प्रदीप भैय्या (बबलू शेठ)मुंडे, बाबासाहेब शिंदे, नवनाथ क्षीरसागर, विश्वनाथ गायकवाड, रघुनाथ डोळस, राहुल कांदे,शिवा बडे, हनुमंत गुट्टे, भोपल्याचे सरपंच बाळासाहेब मुंडे, श्रीमंत कांगणे, ब्रह्मदेव मुंडे,माणिक बनसोडे,महादेव दौंड,केशव फड, वृक्षराज आंधळे, पिंटू देवडे, अरुणाचल रोडे, पांडुरंग निकते, प्रवीण घाडगे, अण्णा सरवदे आदीसह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नव्या बदलांना स्विकारणाऱ्या शेतकऱ्यांना सर्वतोपरी मदत करणार : मयंक गांधी

## जिथे मने जोडली जातात तिथेच पाणी थांबते : सत्यजित भटकळ

■ सिरसाळा (अतुल बडे)

ग्रामीण भागाच्या शाश्वत विकासासाठी केवळ शेतीत बदल करून चालत नाही, तर विचारांत आणि सामूहिक कृतीतही परिवर्तन आवश्यक आहे. याच दृष्टीकोनातून ग्लोबल विकास ट्रस्टकडून "माती, शेती आणि मती" या त्रिसूत्रीवर आधारित कामाला गती देण्यात येत आहे. आतापर्यंत वैयक्तिक पातळीवर शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यावर भर देण्यात आला होता; मात्र आता गाव पातळीवर एकात्मिक विकास घडवून आणण्याचे मोठे उद्दिष्ट समोर ठेवण्यात आले आहे. ग्रामीण भागातील वास्तव पाहता, अनेक शेतकरी नव्या तंत्रज्ञानाचा स्वीकार करण्यास संकोच करतात. काही ठिकाणी पाण्याची आणि ज्ञानाची कमतरता, तर काही ठिकाणी भांडवलाचा अभाव ही मोठी अडचण आहे. या पार्श्वभूमीवर ग्लोबल विकास ट्रस्ट शेतकऱ्यांना एकत्र आणून गट पद्धती विकसित करत आहे. या गटांमुळे केवळ उत्पादनातच वाढ होत नाही, तर दर्जेदार शेती, बाजारपेठेतील योग्य दर आणि सामूहिक निर्णयक्षमतेलाही बळ मिळते. या प्रक्रियेतून शेतकऱ्यांचा आत्मविश्वास वाढत असून ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवसंजीवनी मिळत आहे. अशा बदलांच्या प्रवासात शेतकऱ्यांना सर्वतोपरी मदत देण्याचा निर्धार मयंक गांधी यांनी व्यक्त केला.

पाण्याचे व्यवस्थापन आणि सामाजिक ऐक्य यांचा अतूट संबंध अधोरेखित करताना पानी फाउंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित



भटकळ यांनी महत्त्वपूर्ण मुद्दा मांडला. "जिथे मने जोडली जातात तिथेच पाणी थांबते आणि तिथेच खरी समृद्धी निर्माण होते," असे सांगताना त्यांनी गावातील एकोपा, सहभाग आणि सामूहिक श्रम यांचे महत्त्व अधोरेखित केले. "एकटा ते ऐकता" हे सूत्र केवळ घोषवाक्य नसून ग्रामीण विकासाचा पाया आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. अंबाजोगाई तालुक्यातील मौजे मांडवा पठाण येथे झालेला कार्यक्रम हा या व्यापक विचारांचा प्रत्यक्ष नमुना ठरला. नव्याने केळी लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांना ग्लोबल विकास ट्रस्टच्या माध्यमातून आर्थिक व तांत्रिक सहाय्य देण्यात आले. भांडवलाच्या अभावामुळे मागे राहणाऱ्या शेतकऱ्यांना AU Small Finance Bank च्या माध्यमातून कर्जसहाय्य उपलब्ध करून देण्यात आले, तर सिंचनासाठी ३८ शेतकऱ्यांना ठिबक संचांचे वितरण करण्यात आले.

गुढी पाडव्याच्या शुभमुहूर्तावर उर्वरित शेतकऱ्यांना मदत देऊन या उपक्रमाला पूर्णता देण्यात आली. मांडवा पठाण येथील हनुमान मंदिरात झालेल्या या कार्यक्रमातून एक स्पष्ट संदेश समोर आला. शाश्वत शेती आणि समृद्ध गावांसाठी केवळ संसाधने नाहीत, तर सामूहिक विचार आणि एकजूट हीच खरी ताकद आहे. या कार्यक्रमास ग्लोबल विकास ट्रस्टचे ट्रस्टी संजय परमार, सरपंच गणेश रुद्राक्ष, सत्यप्रेम नरवणे यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमास मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

# आ .धनंजय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली पाणी पुरवठा सभापती सौ .जयश्रीताई रवींद्र गित्ते यांच्या हस्ते मलिकपूरा भागात ६ किमी नवीन वाढीव पाणीपुरवठा पाइपलाईनचा शुभारंभ

## परळीतील पाणीप्रश्न तात्काळ सोडवण्यासाठी नगर परिषद पाणी पुरवठा विभाग नेहमी तत्पर – पाणी पुरवठा सभापती सौ .जयश्रीताई रवींद्र गित्ते



■ परळी वैजनाथ (प्रतिनिधी)

परळी विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आ. धनंजय मुंडे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली परळी वैजनाथ शहरातील पाणीपुरवठा प्रश्न नगर परिषद पाणीपुरवठा विभाग सोडविण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहे. शहरातील नागरिकांना नियमित पाणी मिळावे यासाठी विविध उपाययोजना राबविल्या जात आहेत. शहराच्या इतर भागात पाणीप्रश्न उद्भवल्यास त्वरित उपाययोजना करून समस्या दूर करण्यास नगर परिषद कटिबद्ध आहे.

कोणत्याही परिस्थितीत शहराला पाणी कमी पडू देणार नाही. तसेच, उन्हाळ्याच्या हंगामात नागरिकांनी पाणी जपून वापरावे आणि अपव्यय टाळावा असे आवाहन सभापती सौ. जयश्रीताई गित्ते यांनी मलिकपूरा भागात ६ किमी नवीन वाढीव पाणीपुरवठा पाइपलाईनचा शुभारंभ प्रसंगी प्रतिपादन केले आहे. परळीतील पाणीप्रश्न तात्काळ सोडवण्यासाठी नगर परिषद पाणी पुरवठा विभाग नेहमी तत्पर असल्याचेही पाणी पुरवठा सभापती सौ.जयश्रीताई रवींद्र गित्ते यांनी सांगितले.

परळी वैजनाथ शहरातील पाणीपुरवठा अधिक सक्षम व नियमित करण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल टाकत, पवित्र रमजान ईदच्या मंगलमय दिवशी प्रभाग क्रमांक १७ मधील मलिकपूरा परिसरात नवीन सहा किलोमीटर लांबीच्या पाणीपुरवठा पाइपलाईनचे (४ इंच व ६ इंच) शुभारंभ नगर परिषदेच्या पाणीपुरवठा सभापती सौ. जयश्रीताई रवींद्र गित्ते यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून उत्साहात करण्यात आले. आ. धनंजय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली साकारलेल्या या योजनेमुळे शहरातील व परिसरातील नागरिकांना दिलासा मिळणार आहे. या प्रसंगी प्रभागातील नगरसेवक हाजी बाबू, नगरसेवक रमेश पवार,सदिक भाई, असद भाई, अन्सार भाई,सम्मू भाई, रशीद भाई तसेच स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. नव्याने टाकण्यात येत आसलेल्या पाइपलाईनमुळे मलिकपूरा भागात पाण्याचा दाब वाढून अधिक नियमित व सुरळीत पाणीपुरवठा होणार आहे.

यावेळी बोलताना सौ.जयश्रीताई गित्ते यांनी सांगितले की, परळी वैजनाथ शहरातील पाणीपुरवठा नियमित सुरळीत सुरू असून काही भागांमध्ये निर्माण होणाऱ्या अडचणी मागणीनुसार तातडीने दूर करण्यात येत आहेत. शहरातील प्रत्येक घरापर्यंत शुद्ध व पुरेसा पाणीपुरवठा पोहोचविण्या साठी नगर परिषद पाणीपुरवठा विभाग कटिबद्ध आहे.

कोणत्याही परिस्थितीत शहराला पाणी कमी पडू दिले जाणार नाही, अशी ठाम ग्वाही त्यांनी दिली. उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी पाणी जपून वापरावे, पाण्याचा अपव्यय टाळावा आणि प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहनही पाणी पुरवठा सभापती सौ.जयश्रीताई रवींद्र गित्ते यांनी केले.

# जल ही जीवन, जल ही अमृत संपूर्ण सृष्टीसाठी पाण्याचा एक-एक थेंब महत्त्वाचा

आज जगात पाणी हा महत्वाचा घटक आहे.कारण जल नहीं तो कुछ नहीं! पृथ्वीतलावर मानवजातीच्या अतींरेकामुळे आज निसर्गाचे संतुलन डगमगतांना दिसत आहे.अन्न, वस्त्र, निवारा याची मुख्य जळ-मुळ पाणी आहे.कारण पाण्याशिवाय कोणतीही गोष्ट शक्यच नाही.भारतासह अनेक देशांमध्ये दरवर्षी पाण्याचा हा!हा!कार! होतांना आपण पाहतो.भारतात मार्च महिन्यापासुनच देशातील अनेक भागांत पाण्याची समस्या निर्माण होत असते.आजही अनेक देश पाण्यासाठी कडवी झुंज देत आहे. आज आपण कुठेही गेलो तरी पाणी अती आवश्यक आहे.आकाश-पाताळ,पुर्व-पश्चिम, उत्तर- दक्षिन म्हणजेच आपण जगाच्या पाठीवर कुठेही गेलो तरी मानव, पशु-पक्षी व संपूर्ण जीवजंतू हे पाण्याविना जगुच शकत नाही. पाण्याविना निसर्ग नाही व मानवही नाही.म्हणजेच आज पाणी सर्वांसाठीच अनमोल आहे.त्यामुळे पाण्याचे महत्व सर्वांनीच लक्षात ठेवले पाहिजे.१९९२ ला पर्यावरण व विकास या विषयावर संयुक्त राष्ट्र संमेलन आयोजित करण्यात आले होते.यावेळेस विश्व जल दिवस या विषयावर चर्चा करण्यात आली व संयुक्त राष्ट्र संघानेने प्रत्येक वर्षी २२ मार्चला विश्व जल दिवस साजरा करण्याचे जाहीर केले.यानंत १९९३ मध्ये २२ मार्चला संपूर्ण जगात विश्व जल दिवस पहिल्यांदा साजरा करण्यात आला.यावेळेस जल संरक्षण आणि रख-रखाव यावर जनजागृतीचे मोठे अभियान छेडण्यात आले.विश्व जल दिवसाला पाणी वाचविण्याचा "संकल्प" दिवस सुध्दा म्हटल्या जाते.या दिवसाला पाणी संरक्षणा विषयी जागृकता व पाण्याचे महत्व याला जास्त महत्त्व दिले जाते.आज मानवाच्या जीवनाचा महत्वाचा घटक म्हणजे पाणी आहे. कारण पाण्याविना संपूर्ण सृष्टीअधुरी आहे.आपण जगाच्या भुभागाचा विचार केला तर या पृथ्वीतलावर ७० टक्के पाणी व ३० टक्के भुभाग आहे.तरीही जगात पीण्याच्या पाण्याची समस्या अत्यंत गंभीर असल्याचे दिसून येते.कारण ७० टक्के समुद्राचे पाणी खारे असल्यामुळे पीण्यायोग्य नाही.सध्या संपूर्ण जग अत्याधुनिक युगाकडे वाटचाल करतांना दिसते. त्यामुळे जगात अनेक नवीन नवीन समस्या उदयास येतांना दिसतात.त्यामुळे आज संपूर्ण जगात पीण्याच्या पाण्याची समस्या मोठ्या प्रमाणात दिसून येते.याचे मुख्य कारण म्हणजे बदलते हवामान व जगातील वाढती लोकसंख्या यामुळे जगातील ५० टक्के जंगलसंपदा मानवाच्या अतिरेकामुळे नस्तनाबुत झाली आहे. त्यामुळे पावसाचे पाणी



जमिनीत न मुरता ते सरळ समुद्रात जात आहे. यामुळे आज जगात अत्यंत गंभीर समस्या निर्माण होऊन दिवसेंदिवस समुद्राची पातळी वाढत आहे. समुद्राची पातळी वाढने म्हणजेच पृथ्वीतलावरील संपूर्ण सृष्टीच्या बाबतीत धोक्याची घंटा आहे.त्यामुळे पाण्याचा विषय साधा नसुन अत्यंत गंभीर आणि चिंतेचा विषय आहे.जगात वाढते कारखाने, औद्योगिकीकरण, शहरीकरण, युद्धजन्य परिस्थिती, अनेक परमाणु परिक्षण यामुळे निसर्गानचे संतुलन डगमगतांना दिसत आहे. कारखाण्यांच्या दुषीत वातावरणामुळे व तापमानामुळे अनेक हिमकडे कोसळताना आपण पहातो. यामुळे संपूर्ण जगात महाप्रलय, सुनामी आल्याचेसुध्दा आपणासर्वांना ग्यात आहे.जगातील हिमकडे साबुत रहाले तर पाण्याची समस्या आपोआप कमी होईल. परंतु मानवाने स्वत:च्या स्वार्थासाठी हिमकड्यांचा बळी घेतांना दिसत आहे. अनेकदा देवभुमित आलेला महाप्रलय हा हिमकडा कोसळल्याने आलेला महाप्रलय आहे.संपुर्ण भारतात ८० टक्के पीण्यायोग्य पाणी हिमकड्यातुन



मीळत असते.परंतु मानवाच्या अतींरेकामुळे हिमकडे वेळेच्या आधी वितळायला लागले तर या पृथ्वीतलावर २० वर्षांनंतर पीण्याकरीता एक थेंब सुध्दा पाणी मिळणार नाही. त्यामुळे पाणी वाचविण्यासाठी तळागाळातुन प्रयत्न व्हायलाच पाहिजे.आज जंगलातील संपूर्ण हिंसक पशु शहरांकडे का येत आहे.याचा विचार कोणीच करीत नाही. परंतु जगातील संपूर्ण मानवजातीने हे लक्षात ठेवले पाहिजे की,जंगलातील हिंसक पशु-पक्षी शहरात येत नसुन आपण त्यांच्या घरावर म्हणजेच जंगलावर अतिक्रमण करीत आहोत. त्यामुळे जंगलातील पशु-पक्षी शहरात व गावात येतांना दिसतात.पुर्वी छोटे-छोटे तलाव असायचे.परंतु आज पुर्विचे छोटे-छोटे तलाव वस्ती व कारखाण्यामध्ये परीवर्तीत झालेले दिसुन येतात.त्यामुळे आज गावात, शहरात,वस्तीत संपूर्ण ठिकाणी पीण्याच्या पाण्याची समस्या मोठ्या प्रमाणात भेडसावतांना दिसून येते.याचे मुख्य कारण म्हणजे मानवाने निसर्गावर केलेला अत्याचार होय. सध्याच्या काळात जगामध्ये आगजनीच्या घटना व वनवेलागने मोठ्या प्रमाणात दिसून येतात.अनेक मोठमोठी जंगले अजुनही जळत आहे.कारण मानवाने जमीनीच्या पोटातील पाणी संपूर्णतः निचोड्डन (आटवुन) टाकले आहे. जगातील अनेक भागात ज्वालामुखीचा उद्रेक मोठ्या प्रमाणात होतांना आपण पहातो. भुकंप,सुनामी, ज्वालामुखीचा उद्रेक ह्या संपूर्ण घटना पृथ्वीतलावर पाण्याची पातळी कमी होत असल्याने होत आहे. कारण जंगलसंपदा टीकुन रहाली असती तर पाण्याची समस्या मुळातच रहालीच नसती.पाणी टीकुन रहाले असते तर ज्वालामुखी, सुनामी, महाप्रलय,भुकंप,वनवे लागने इत्यादी विनाशकारी घटनांचा उद्रेक झाला नसता. अजुनही मानवजाती पाण्याचे महत्व समजल्याचे दिसून येत नाही.पुर्वी नदी,ओढे, तलाव,झिरा व विहिरीतून पाणी घ्यायचे परंतु आता नदी,तलाव व विहिरी आटुलागल्या आहेत. विहीरीची खोली ५० ते ६० फुटांपर्यंत असायची परंतु पाण्याचा दुष्काळ पहाता ५० ते ६० फुटांपर्यंतचे विहिरीचेसुध्दा पाणी आटल्याचे दिसून येते.त्यामुळे आता मानवजातीने बोरवेलचा सहारा घेऊन ५०० ते ७०० फुटांवर पाण्यासाठी जावे लागत आहे.मनुष्याला पाण्याचा अधिकार फक्त ५० ते ६० फुटांपर्यंतच होता.परंतु मानवाने पाण्यासाठी संपूर्ण सीमा ओलांडून पाताळात जाऊन तेथील पाण्यावर अतीक्रमन केल्याचे दिसून येते. म्हणजेच मानवाने सापाच्या बिळात हात टाकला आहे.ज्या पाण्यावर मानवजातीचा तिळमात्र अधिकार नाही तेही पाणी आपण आपली तहान भागवण्यासाठी वापरीत आहोत.हा मानवाचा निसर्गसृष्टीवर खुला अन्याय व अत्याचार नाही काय?आज मानवाच्या निष्काळजीपणामुळे व अतिरेकामुळे जंगले वाळुन (सुकली) गेली आहे.आज संपूर्ण जग बारूदच्या ढीगाऱ्यावर बसले आहे ही बाब सर्वांनाच ग्यात आहे.अनेक देशात गृहयुद्ध व आता महायुद्ध सुरू आहे.उदाहरण द्यायचे झाले तर रशिया -युक्रेन,अमेरिका-इजरायल-इराण- गाजा-इराण-हिज्बुला यांनी महायुद्धाचे स्वरूप घेतले आहे यामुळे युद्धाने जनुकाय रक्ताची नदी वाहत आहे की काय असे वाटत आहे. सध्याच्या परिस्थितीत या देशात आगडोंब उसळला असुन अनेक क्षेत्र जळुन खाक झाले आहे.त्याचप्रमाणे अनेक देश परमाणुपरीक्षण करतांना आपण पहातो.अशा परीस्थितीत भुमाता(पृथ्वी) पाण्याचे संग्रहन कसे काय करेल? मानव आज आगीशी खेळत आहे त्यामुळे तो पाण्याचे महत्व विसरल्याचे दिसून येते.कठीण परिस्थिती पाहता जगाने पाणी वाचवीण्याचा संकल्प करायला पाहिजे.अन्न,वस्त्र,निवारा आवश्यक आहे यात दुमत नाही.परंतु अन्न,वस्त्र, निवारा यांची उत्पत्ती ही पाण्यापासूनच होत असते.त्यामुळे भारतासह संपूर्ण जगाने विश्व जल दिवस साजरा करतांना पाण्याचे महत्व समजुन घेतले पाहिजे.जगापुढे शुद्ध पाण्याची गंभीर समस्या आहे. पाण्यासाठी अनेक देशांमध्ये हा!हा!कार! माजल्याचे दिसून येते.त्यामुळे पाणी वाचविण्यासाठी भारतासह संपूर्ण जगाने युद्ध पातळीवर प्रयत्न करण्याची गरज आहे.पर्यावयण व निसर्ग सुरक्षित तर पाणी सुरक्षित. पाणी सुरक्षित तर मानव, पशुपक्षी,जीव-जंतु सुरक्षित,जिव सृष्टी सुरक्षित तर पृथ्वी सुरक्षित ही बाब सर्वांनीच लक्षात ठेवली पाहिजे.आज अनेक देशांतील जंगल संपदा नस्तनाबुत करून कारखाने,शहरे मोठ्या प्रमाणात उभारले आहे.त्यामुळे भारतातच नव्हे तर संपूर्ण जगात जंगलातील हिंसक प्राणी (वाघ,अस्वल, सिंह, कोल्हा, बिबट्या, जहरीले साप) शहरात शिरकाव करतांना दिसतात.यामुळे मोठ्या प्रमाणात जिवीत हानी सुध्दा झाली आहे व होत आहे.याचे मुख्य कारण म्हणजे जंगलातील पाण्याचा तुटवडा होय.आज पाण्यासाठी मानव व प्राणी एकमेकांचे कट्टर शत्रू बनल्याचे दिसून येते.त्यामुळे संपूर्ण जगाने पाणी वाचविण्याचा संकल्प केला पाहिजे.असे भाकीत आहे की २०४० मध्ये भारतात प्यायला पाणी मिळणार नाही.अशी स्थिती येवू शकते याला नाकारता येत नाही.संयुक्त राष्ट्राने जगातील पाण्याच्या परीस्थितीच्या अहवालामध्ये ही भीती वर्तवली आहे.जगात पुढे पाण्याचे भीषन संकट येणार असून भारत या संकटाच्या केंद्रस्थानी रहाण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.नद्या, सरोवर, तलाव यामध्ये उपलब्ध असलेले पीण्याचे पाणी झपाट्याने प्रदुषित होत आहे.त्यामुळे कारखान्याचे दुषितपाणी व सांडपाणी यांना पीण्याच्या पाण्यापासून कोसो दूर ठेवण्याची गरज आहे.दूषित पाणी पील्यामुळे जगात दरवर्षी लाखोच्या संख्येने मानवीय हाणी व पशुपक्षांची हाणी मोठ्या प्रमाणात होतांना दिसुन येते यालाही थांबविण्याची गरज आहे. एकावर्षात पडलेले पावसाचे पाणी अडवीता आले तर पाच वर्षे पुरेल इतका पाणी साठा आपल्याला उपलब्ध होवू शकतो. परंतु त्यासाठी योग्य नियोजन करणे अजुनही आपल्याला जमले नाही.आताही ८० टक्के पाणी प्रदूषित आहे.पाण्याच्या स्त्रोतांचे होणारे प्रदुषण आणि पाणी साठविण्यासाठी नसलेले नियोजन हे दोन प्रश्न आहेत.यावर दुर्लक्ष सुरूच राहील्यास येणाऱ्या काही वर्षांत पिण्याच्या पाण्याची समस्या निर्माण होवू शकते असा इशारा पर्यावरण तज्ज्ञांचे दिला आहे.मानव हा बुध्दीजीवी प्राणी आहे त्यामुळे हे लक्षात ठेवले पाहिजे की पाणी संपले तर आपण संपु,आपण संपलो तर जग संपेल! त्यामुळे विश्व जल दिनाच्या निमित्ताने प्रत्येकांनी पाणी वाचविण्याचा "संकल्प" केला पाहिजे. तेव्हाच पाणी वाचेल.त्याचप्रमाणे "पाणी वाचवा देश वाचवा" हा निर्धार संपूर्ण जगाने अंगीकारला पाहिजे.आज जगातील वाढती पाण्याची समस्या यामुळे अनेक पशुपक्षी लुप्त झाल्याचे दिसून येते. याकरीता जल विश्व दिनाच्या निमित्ताने वाढते प्रदुषण रोखण्याचा व पाणी वाचविण्याचा निर्धार सर्वांनीच अंगीकारला पाहिजे.

**■ लेखक रमेश कृष्णराव लांजेवार**
**(स्वतंत्र पत्रकार)**

## लोकार्थ







## पॉवरिकाची प्रारंभिक सार्वजनिक भागविक्री उद्या खुली होणार

पॉवरिका लिमिटेड ("कंपनी") ने आपल्या पहिल्या-वहिल्या प्रारंभिक सार्वजनिक भागविक्रीसाठी प्रति इक्विटी शेअर ३७५ ते ३९५ रुपयांचा किंमत पट्टा निश्चित केला आहे; प्रत्येक शेअरचे दर्शनी मूल्य ५ रुपये आहे.कंपनीची प्रारंभिक सार्वजनिक भागविक्री वर्गणीसाठी मंगळवार, २४ मार्च २०२६ रोजी खुली होईल आणि शुक्रवार, २७ मार्च २०२६ रोजी बंद होईल.गुंतवणूकदार किमान ३७ इक्विटी शेअर्ससाठी आणि त्यानंतर ३७ इक्विटी शेअर्सच्या पटीत बोली लावू शकतात.हा आय पी ओ ७०० कोटी रुपयांपर्यंतचा 'ताजा अंक' आणि प्रवर्तकांकडून नरेश ओबेरोई फमिली ट्रस्ट व कबीर आणि किमया फमिली ट्रस्ट यांच्याकडून ४०० कोटी रुपयांपर्यंतचा 'विक्री प्रस्ताव' यांचा समावेश असलेला संयुक्त प्रस्ताव आहे.ही कंपनी 'एकात्मिक ऊर्जा समाधान प्रदाता' असून, ती डिझेल जनरेटर सेट्स मध्ये विशेष प्राविण्य बाळगते; या जनरेटरचा वापर प्राथमिक (मुख्य) आणि पर्यायी (स्टँडबाय) अशा दोन्ही प्रकारच्या गरजांसाठी केला जातो.

## चुपा चुप्सची मुलांसाठी क्रेझी रॅफे, ट्विस्टेड जेली

परफेट्टी व्हॅन मेल्ले कंपनीचा कन्फेक्शनरी ब्रँड चुपा चुप्सने क्रेझी रॅफे नावाची नवीन जेली बाजारात आणली आहे, ही जेली लांब, वाकडी-तिरपी असून आतमध्ये फिलिंग आहे, त्यामुळे रोजच्या स्नॅकिंगला मजेशीर ट्विस्ट मिळतो, दिसायला वेगळी आणि मजेदार असल्यामुळे किशोरवयीन आणि लहान मुलांसाठी खास तयार केली आहे. 30 ग्रॅ वजनाची ही जेली ₹10 ला मिळते.क्रेझी रॅफे तयार करताना एक साधी पण महत्त्वाची गोष्ट लक्षात घेतली. आजची तरुण पिढी फक्त चव बघत नाही. त्यांना दिसायला मजेदार, खेळता येईल अशी आणि मित्रांसोबत शेअर करता येईल अशी कँडी आवडते. रोजच्या क्षणांत थोडी मजा आणि उत्सुकता आणणारे स्नॅक्स त्यांना हवे असतात. लांब आणि वाकडी-तिरपी आकाराची जेली आणि जिराफपासून प्रेरित डिझाइनमुळे क्रेझी रॅफे साध्या कँडीला मजेशीर अनुभव देते.या जेलीच्या बाहेर स्ट्रॉबेरी चवीचे कव्हर आहे, जे लाल रंगाच्या 2 छटांमध्ये दिसते, आतमध्ये क्रीमी व्हॅनिला फिलिंग आहे. आंबट आणि गोड चव एकत्र आल्यामुळे खाण्याचा वेगळा अनुभव मिळतो,

## बडोदा बीएनपी परिबा मॅनेजमेंटचा चौथा वर्धापन दिन साजरा

भारतातील अग्रगण्य सरकारी बँक आणि युरोपमधील प्रसिध्द मालमत्ता व्यवस्थापन कंपनी यांच्या संयुक्त भागीदारीतून आकारास आलेल्या बडोदा बीएनपी परिबा ॲसेट मॅनेजमेंट इंडिया प्रायव्हेट लिमिटेडने आपल्या स्थापनेचा चौथा वर्धापन दिन साजरा करताना निधी व्यवस्थापनाचा दैदिप्यमान टप्पा गाठला आहे. व्यवस्थापनांतर्गत असलेला गुंतवणूकदारांचा एकूण निधी (एयूएम) तब्बल ५५,००० कोटी रुपयांपुढे झेपावला असून कंपनीने चौथ्या वर्धापनदिनी




यशाचा हा महत्त्वपूर्ण टप्पा गाठला आहे. आपल्या चौथ्या वर्धापन दिनानिमित्त कंपनीने आणखी २६ शहरांमध्ये नवीन शाखा सुरु केल्या आहेत. या विस्तारासह कंपनीने देशभरातील १३२ हून अधिक शहरांमध्ये आपले जाळे विस्तारले आहे. या शाखा विस्तारातून कंपनीने गुंतवणूकदारांना गुंतवणूकीबाबत सर्व प्रकारच्या सेवा प्रदान करणारी भारतातील एक ॲसेट मॅनेजमेंट कंपनी म्हणून आपले स्थान अधिक बळ केले आहे.सर्व योजनांच्या सातत्यपूर्ण कामगिरीमुळे कंपनी सध्या व्यवस्थापित करत असलेल्या एकूण गुंतवणूक निधीत (एयूएम) समाधानकारक वाढ झाली आहे. मालमत्ता गुंतवणूकीच्या विविध प्रकारच्या श्रेणींमध्ये सातत्यपुर्ण कामगिरी ही प्रामुख्याने संशोधनावर आधारित गुंतवणूक आणि अतिशय सक्षम प्रक्रिया-केंद्रित दृष्टिकोन यामुळे शक्य झाली आहे. बातमी-४]भारतीय टपाल खात्याच्या ३ नवीन प्रीमिअम सेवा

भारत सरकारच्या दूरसंचार मंत्रालयाच्या 'टपाल विभागाने' राष्ट्रीय स्तरावर तीन नवीन 'प्रीमियम डिलिव्हरी सेवा' सुरू केल्या आहेत २४ स्पीड पोस्ट, २४ स्पीड पोस्ट पार्सल आणि ४८ स्पीड पोस्ट. वेगाने विस्तारणाऱ्या 'एक्स्प्रेस लॉजिस्टिक्स' आणि 'निश्चित वेळेत डिलिव्हरी' देणाऱ्या क्षेत्रात 'इंडिया पोस्ट'ची क्षमता अधिक बळकट करणे, हा या सेवा सुरू करण्यामागील मुख्य उद्देश आहे. या उत्पादनांच्या (सेवांच्या) लोकार्पण सोहळ्याचे आयोजन माननीय केंद्रीय दूरसंचार मंत्री श्री. ज्योतिरादित्य एम. शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले होते. याप्रसंगी माननीय दूरसंचार राज्यमंत्री डॉ. चंद्रशेखर पेम्मासानी, टपाल सचिव श्रीमती वंदिता कौल, टपाल सेवा महासंचालक श्री. जितेंद्र गुप्ता आणि सदस्य (संचालन) श्री. हरप्रीत सिंग यांचीही उपस्थिती लाभली. या प्रीमियम सेवा सुरुवातीला देशातील सहा महानगरांमध्ये सुरू करण्यात आल्या आहेत. या सेवांचा विस्तार टप्प्याटप्प्याने 'टियर-१' आणि 'टियर-२' श्रेणीतील शहरांपर्यंत केला जाईल, जेणेकरून या सेवांचा आवाका अधिक व्यापक होईल आणि त्या जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचतील. या लोकार्पण सोहळ्यामध्ये सदर सहा महानगरांमधील प्रतिनिधींनी 'व्हर्च्युअल' (दूरदृश्यप्रणाली) माध्यमातून सहभाग नोंदवला.

**■ संकलन-संयोजन**
**सुबोध रणशेवरे**

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)



# राष्ट्रीय मूलनिवासी बहुजन कर्मचारी संघ परळी नगरपरिषद कंत्राटी कामगार शाखा स्थापन

## अध्यक्षपदी विक्रांत समिंदरसावळे, उपाध्यक्ष अमोल मस्के, सचिव सुमेर समिंदरसावळे यांची नियुक्ती

परळी वै प्रतिनिधी

राष्ट्रीय मूलनिवासी बहुजन कर्मचारी संघ (RMBKS) या ट्रेड युनियनची नगरपरिषद कंत्राटी कामगारांची परळी वैजनाथ शाखा अधिकृतपणे स्थापन करण्यात आली असून, या शाखेला राज्य कार्यकारिणीकडून मंजुरी मिळाल्याची माहिती देण्यात आली आहे. सदर संघटनेची नोंदणी भारतीय ट्रेड युनियन अधिनियम 1926 अंतर्गत (रजि. क्र. ALC/17/10744, दि. 30 मे 2013) झाली आहे.

मा. वामन मेश्राम यांच्या अध्यक्षतेखाली कार्यरत असलेली ही संघटना देशभरातील सरकारी व खाजगी क्षेत्रातील संघटित व असंघटित कामगारांच्या हक्कांसाठी लढा देत असून, त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी सातत्याने कार्यरत आहे. याच पार्श्वभूमीवर परळी वैजनाथ येथे नगरपरिषद कंत्राटी कामगारांची शाखा स्थापन करण्यात आली आहे.

दि. 20 मार्च 2026 रोजी जाहीर करण्यात आलेल्या कार्यकारिणीत विक्रांत सूर्यकांत समींदरसवळे (अध्यक्ष), बालाजी मारोती गजबे (कार्यकारी अध्यक्ष), अविनाश वसंतराव गायकवाड (महासचिव), अमोल अर्जुन मस्के (उपाध्यक्ष), सुमेर सूर्यकांत समींदरसवळे (सचिव ) संध्या भैय्यासाहेब जगतकर (कोषाध्यक्ष )लता पंडित इंगळे यांच्यासह सदस्य पदी सुनील माणिकराव जगतकर, कैलास हरिभाऊ उपाडे भैय्यासाहेब शिवाजीराव जगतकर अतुल अनिल चौरे, सुभाष गित्ते आदींचा समावेश आहे.

नवीन कार्यकारिणीचे पदाधिकारी नगरपरिषद कंत्राटी कामगारांसह संघटित व असंघटित क्षेत्रातील कामगारांच्या समस्या सोडवण्यासाठी संबंधित प्रशासनाशी समन्वय साधणार असून, भारतीय कामगार कायद्यांनुसार मिळणाऱ्या हक्कांविषयी जागरूकता निर्माण करणार आहेत. कामगारांच्या हितासाठी प्रभावीपणे कार्य करत त्यांच्या न्याय्य मागण्यांना वाचा फोडण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

या उपक्रमासाठी प्रशासनाने सहकार्य करावे, अशी अपेक्षा व्यक्त करत ही माहिती प्रसारमाध्यमांसाठी देण्यात आली आहे.





# ओंकार साखर कारखाना युनिट नंबर ८ पांगरी तालुका परळी वैजनाथ जिल्हा बीड या कारखान्याचा हंगाम २०२५-२६ ची सांगता

पांगरी-परळी

येथील ओंकार साखर कारखाना युनिट नंबर ८ चा सांगता समारंभ चेअरमन मा.श्री बाबूरावजी बोत्रे पाटील साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली शनिवार दिनांक २१ मार्च २०२६ रोजी संपन्न झाला. या वेळी विधिवत गव्हाण पूजन व काटा पूजन करून कार्यक्रम संपन्न झाला.कारखान्याने ३ लाख ४० हजार मे. टन गाळप करून शेतकऱ्यांचा विश्वास संपादन केला.

ओंकार साखर कारखान्याने या हंगामात भागातील शेतकऱ्यांना प्रति टन ३०५० रुपये असा सर्वोतम ऊस दर देत शेतकऱ्यांच्या विश्वासाला न्याय दिला. ओंकार ग्रुपचे चेअरमन मा. श्री बाबूरावजी बोत्रे पाटील साहेब यांच्या प्रामाणिक प्रयत्नांना ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी, कर्मचाऱ्यांनी, व ऊस तोडणी / वाहतूक ठेकेदारांनी मोठी साथ दिली. यातून चालू गळीत हंगामात कारखान्याने ३ लाख ४० हजार ९१६ मे.टन ऊसाचे गाळप केले आहे.

या प्रसंगी परळी भाजपा तालुका अध्यक्ष श्री राजेश गीते कारखान्याचे जनरल मॅनेजर श्री सुधाकर सोळंके साहेब पोलिस पाटील संघटनेचे माऊली मुंडे कारखान्याचे सर्व खातेप्रमुख , कर्मचारी व ऊस उत्पादक शेतकरी तसेच तोडणी /वाहतूक ठेकेदार मोठ्या संखेने उपस्थित होते.ओंकार ग्रुपच्या नेतृत्वाखाली कारखाना आगामी काळातही शेतकऱ्यांच्या,ऊस तोडकामगार व वाहतुक ठेकेदार यांच्या हिताला प्राधान्य देत योग्य दर आणि वेळेवर सेवा देण्यासाठी सदैव कटिबद्ध राहील असा विश्वास या वेळी व्यवस्थापनाकडून व्यक्त करण्यात आला.

# संशोधकाचा संशोधक : प्राचार्य डॉ. व्ही टी इंगोले

अनेक जणांना फक्त एक पेटंट मिळवण्यासाठी पूर्ण आयुष्य खर्च घालावे लागते. जागतिक कीर्ती वर हा बहुमान प्राप्त होणे म्हणजे कठीणच बाब आहे. कधी कधी तर आयुष्य खर्च करूनही पेटंट प्राप्त होत नाही. पण आमच्या अमरावती शहरात एक असे संशोधक आहेत ; एक असे प्राचार्य आहेत आणि एक असे शास्त्रज्ञ आहेत ही ज्यांच्या नावावर एक दोन नव्हे तर चक्क 37 पेटंटची नोंद झालेली आहे .त्या माणसाचे नाव आहे प्राचार्य विजयराव इंगोले. पण सर्वजण त्यांना व्हि.टी. इंगोले म्हणूनच ओळखतात

पूर्ण संशोधनाला वाढलेला हा माणूस खऱ्या अर्थाने संशोधक आहे .आपण ज्याप्रमाणे पुस्तके वाचतो त्याप्रमाणे यांचा प्रत्यक्ष संशोधनासाठी दिलेला आहे. सकाळ संध्याकाळ दुपार रात्र संशोधन म्हणजे संशोधनच आणि त्यामुळे एक दोन नव्हे तर त्यांच्या गाठीशी आहेत 37 पेटंट. आपले पूर्ण आयुष्य संशोधनाला वाढलेल्या या माणसाला खरोखरच मनापासून सलाम करावासा वाटतो

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ ते मार्डी रोडवर या माणसाने ग्रीन सर्कल नावाचे आंतरराष्ट्रीय संशोधन केंद्र उभारले आहे. तिथे सातत्याने त्यांचे संशोधन सुरू असते .बरं हा माणूस फक्त संशोधन केंद्र स्थापन करून थांबला नाही तर आपल्याबरोबर इतरांनीही संशोधन करावे व त्याला सर्व प्रकारच्या सुविधा प्राप्त व्हाव्यात यासाठी त्यांनी ग्रीन सर्कल हे आपले संशोधन केंद्र सर्व संशोधकांसाठी मोकळे केलेले आहे. तुम्ही संशोधनासाठी या. तुमच्यासाठी सर्व प्रकारच्या सोयी या ग्रीन सर्कल या संशोधन केंद्रामध्ये प्रा इंगोलेसर व त्यांच्या सहचारिणी डॉ. इंदिरा इंगोले यांनी केलेल्या आहेत.

एवढे मोठे संशोधन करूनही आणि 37 पेटंट नावावर असूनही या माणसाने आपले अमरावती हे गाव सोडले नाही. अमरावतीवर त्यांचे नितांत प्रेम आहे आणि म्हणून याच गावात राहून त्यांनी आपली सामाजिक बांधिलकी कायम ठेवली आहे .त्यांना असे वाटते की अमरावती परिसरातील संशोधकांना काही मार्गदर्शन लागले .काही सुविधा लागल्या तर आपण त्यासाठी तत्पर असलो पाहिजे. आपल्याही पडत्या काळात अनेक लोकांनी आपल्याला मदत केलेली आहे आणि म्हणूनच प्रत्येकाला मदत करणे त्याचे आयुष्य उभे करण्यासाठी त्याला हातभार लावणे आणि त्यांच्यामधील संशोधक वृत्ती वाढावी यासाठी प्रामाणिक प्रयत्न करणार माणूस म्हणजे प्राचार्य डॉक्टर इंगोलेसर.

सर आता प्राचार्य म्हणून सेवानिवृत्त झालेले आहेत. त्यांचे वय जरी आज 78 असले तरी त्यांचा काम करण्याचा उत्साह हा तरुणासारखाच आहे. अनेक तरुणांचे आयुष्य त्यांनी उभे केलेले आहेत आता आमच्या अमरावतीचीच गोष्ट घ्या ना अमरावतीला एक उद्योजक आहेत श्री अमित आरोकर . या उद्योजकाच्या पाठीशी ते समर्थपणे उभे राहिले .आपले एक वर्ष त्यांनी या तरुणासाठी दिले. त्याची सोलर कंपनी पूर्ण भारतामध्ये आपल्या स्वतःच्या पायावर उभे राहिलेली आहे. अमरावतीमध्ये सगळ्यात जास्त टर्नओव्हर असणारा उद्योजक म्हणजे अमित आरोकर. इंगोले सर या मुलाच्या पाठीशी उभे राहिले नसते तर आज हा राष्ट्रीय पातळीवर आपला उद्योग मिळू शकला नसता.

सर पुण्याच्या सुप्रसिद्ध अशा पी आय सी टी या अभियांत्रिकी महाविद्यालयात प्राचार्य म्हणून कार्यरत होते. अतिशय शिस्तबद्ध वक्तशीरपणा आणि शैक्षणिक अभ्यास ही त्यांची गुणवैशिष्ट्ये आहेत. अनेकांना त्यांनी आयुष्यात उभे केले आहे तसेच विद्यार्थ्यांची संशोधन वृत्ती वाढवण्यासाठी



- प्रा. डॉ.नरेशचंद्र काठोळे, संचालक, मिशन आयएएस, अमरावती कॅम्प

2 हजार झाडे असतील. त्यात फुलझाडे आहेत त्या सर्वांचे संगोपन त्या एखाद्या लहान मुलाप्रमाणे करतात

अमरावती शहरातील एक आदर्श जोडपं म्हणून श्री विकी इंगोले व डॉक्टर इंगोले यांचा उल्लेख करावा लागेल. त्यांनी शोधून काढलेली अंबादेवी टेम्पल हे कालांतराने अमरावती जिल्ह्याची इतिहासात क्रांती करणार आहे. मोर्शी तालुक्यात सालबर्डीच्या जंगलात यांनी पूर्वी लेणी शोधून काढली त्या कारची चित्रे आज त्या लेणीमध्ये आहे त्यासाठी त्यांनी संशोधन केले छायाचित्रण केले व अशा प्रकारच्या लेणी आपल्या विदर्भातील सालबर्डी जवळ आहे हे लोकांना अवगत करून दिले.

माझी एक विद्यार्थिनी आहे प्राजक्ता बोरकर तिचे नाव की बारावीच्या परीक्षेत संपूर्ण महाराष्ट्रातून तिच्या काळात पहिली आली शिकण्यासाठी कोणाच्या पी एस सी टी महाविद्यालयात गेली वस्तीगृहाला लागली वस्तीगृहातील मुलींनी तिची रॅगिंग घ्यायला सुरुवात केली. ते अमरावतीला आले तिचे पालक मला भेटले मी भीती इंगोले सरांशी संपर्क साधला तेव्हा ते त्या महाविद्यालयाचे प्राचार्य होते ते सर तिच्या पाठीशी उभे राहिले आणि रॅगिंग चा प्रकार त्यांनी महाजातून शब्द पार केला प्राध्यक्षाचे आई-वडील जरी अमरावतीला असले तरी तिचे शैक्षणिक वडील म्हणून प्राचार्य यांनी तिला वेळोवेळी मार्गदर्शन केले मुलगी पदवी परीक्षा उत्तीर्ण झाली आणि आता मोठ्या पदावर काम करीत आहे

आज-काल कचऱ्याची त्याच्या विल्हेवाटाची प्रमुख मोठी समस्या ही झालेली आहे पण रस्त्यावर असते कचरा हात न लावता त्याचा उचलायचा तसेच हात न लावता कचरापेटीत कसा टाकायचा त्याचे प्रात्यक्षिक त्यांनी अमरावती शहरात नव्हे तर करून दाख दाखविले व त्यावर पेटंट मिळवले.

सरांची सामाजिक बांधिलकी त्यांच्या वर्तनातून जाणवते. अनावश्यक खर्च टाळणे हा पिंड त्यांनी सुरुवात पासून जपला आहे आणि म्हणून स्वतःच्या लग्नात देखील त्यांनी आहे त्याच पोशाखावर स्वतःचे लग्न लावले. अमरावती शहरातील जुन्या पिढीतील सत्यशोधक श्री आनंदराव वाळके व सौ नलिनीताई लडके यांच्या कन्या डॉक्टर इंदिरा लाखे यांच्याशी ते विवाहबद्ध झाले अतिशय साध्या पद्धतीने त्यांनी आपला विवाह समारोह घडवून आणला. यातून उरलेला पैसा ते समाजातील गरजू घटकांपर्यंत पोहोचवतात

गतवर्षी त्यांचे पद्मश्री साठी नामांकन झाले होते अनेक राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय राज्यस्तरीय नामांकित संस्थांनी त्यांना जीवन गौरव पुरस्कार देऊन गौरविले आहे स्वतः लेडीज गव्हर्नर कमलताई गवई यांनी प्रत्यक्ष इंगोले सरांच्या घरी येऊन त्यांच्या गौरव केला आहे व त्यांच्या संशोधन कार्यालय ची पाठशाकन केली आहे. भारत सोडून परदेशात केव्हाही जाऊ शकले असते तशा त्यांना ऑफरही आल्या होत्या पण या माणसाचे भारतावर अमरावती वर आपल्या जन्मभूमीवर नितांत प्रेम आहे आणि म्हणून त्यांनी नम्रपणे या सगळ्या ऑफर नाकारल्या आज संशोधन क्षेत्रामध्ये त्यांचे आगळे नाव आहे आपल्याबरोबरच त्यांनी केली तरी संशोधक घडविले आहेत म्हणूनच त्यांना संशोधकाचा संशोधक ही उपाधी देणे मला योग्य वाटते.

असा हा संशोधक वृत्तीचा माणूस. आपल्या 78 व्या वर्षीही त्यांनी आपला संशोधनाचा पिंड जोपासला आहे. अजूनही काही पेटंट त्यांना मिळू शकतात त्यासाठी ते कार्यरत आहेत अशा या जनसामान्यासाठी त्यांच्या विकासासाठी वेगवेगळ्या पेटंट बनवणाऱ्या व मानवी जीवन सुलभ करणाऱ्या संशोधनाला मूर्तीमंत रूप देणाऱ्या या माणसाला व त्यांनी केलेल्या संशोधनाला मानाचा मुजरा

# श्री क्षेत्र पुंडी ता आष्टी येथे ह भ प जनार्दन दास महाराज (आळंदी देवाची) यांच्या भव्यदिव्य संगीत तुलसी रामायण कथेचे आयोजन



वार्ताहर | आष्टी

श्रीराम नवमी निमित्त श्री क्षेत्र पुंडी वाहिरा येथे दिनांक 19 मार्च ते 27 मार्च या दरम्यान भव्य दिव्य संगीत तुलसी रामायण कथेचे आयोजन करण्यात आले आहे. श्री क्षेत्र आळंदी देवाची येथील संगीत अलंकार रामायणाचार्य ह भ प जनार्दन दास महाराज हे श्रीराम कथा करत आहेत.श्री रामायण कथेसाठी सिंथ वादक म्हणून योगेश महाराज सासणिक अकोला तर तबला साथ आदिनाथ वाडेकर आणि पॅड वादक साथसंगत अजित महाराज पवार करत आहेत. तुलसी रामायण कथेचे हे तिसरे वर्ष असून कथाभाग

तुलसीदास महाराज चरित्र, शिव पार्वती विवाह,पुत्र कामेष्टी यज्ञ,श्रीराम जन्म,बाललीला,विश्वामित्र यज्ञ रक्षण,अहिल्या उद्धार,धनुष्यभंग,सीता राम विवाह, अयोध्याआनंदउत्सव,मंथरा बुद्धिभ्रंश,श्रीराम वनगमन, गुहक भेट,निषादराज भेट,केवट संवाद,पंचवटी, सीताहरण,शबरीभेट,सुग्रीव मैत्री, हनुमंतांकडून सीता शोध,लंका दहन,राम रावण युद्ध,अयोध्येत राज्याभिषेक इत्यादी प्रसंग रामकथे दरम्यान श्रोत्यांना श्रवण करता येणार आहेत.याकरिता उत्तम झाकी दर्शन बुधवंत महाराज यांचे असून ध्वनीसंयोजन रवी जाधव आर के साऊंड अहिल्यानगर करत आहेत. श्रीराम जन्माचे किर्तन दिनांक 26 रोजी सकाळी दहा ते बारा या काळात ह भ प सतीश महाराज दळवी यांचे होणार असून दिनांक 27 रोजी अभंग सारस्वत भागवताचार्य आदिनाथ महाराज दानवे यांचे काल्याचे किर्तन होणार आहे. गायनाचार्य म्हणून ह भ प संपत दानवे,ह भ प अनिल गरुड,देविदास आमटे,मृदुंगाचार्य मयूर महाडिक आळंदी,बळीराम वाडेकर साथ करत आहेत.

दिनांक 27 रोजी शुक्रवारी सायंकाळी सहा ते दहा शंभू सूर्य मर्दानी खेळ प्रशिक्षण संस्था जामखेड यांचे शिवकालीन युद्ध कलेचे प्रात्यक्षिकांचे सादरीकरण या ऐतिहासिक प्रसंगाचे सादरीकरण कार्यक्रम होणार आहे.

रामनवमी निमित्त उपवास प्रसाद पंगत श्री बबनराव बापूराव भालेराव (फौजी) आणि सोन्याबापू नवसुपे कंडक्टर यांच्यावतीने होणार आहे. दिनांक 27 रोजी काल्याच्या कीर्तनानंतरची महाप्रसाद पंगत सचिन थोरवे,विशाल जाधव,राम भागवत आणि महेश धुमाळ यांच्या वतीने असणार आहे.

संगीत तुलशी रामायण कथा आणि त्यानिमित्ताने श्रीराम जप, संगीत भजन,वारकरी कीर्तन या सगळ्यांचा पंचक्रोशीतील भाविकांनी,नागरिकांनी श्रवण लाभ घ्यावा असे आवाहन सरपंच प्रतिभा बाळासाहेब थोरवे,उपसरपंच अनिल गलांडे, रमेश ढगे,शिवाजी वाडेकर,आप्पासाहेब भालेराव,बळीराम वाडेकर,वसंत भागवत,तुकाराम भालेराव,राहुल सुरवसे,अर्जुन काकडे,सोन्याबापु थोरवे,बबन थोरवे,रावसाहेब भालेराव,हरिश्चंद्र थोरवे,संदीप जगदाळे,संतोष वाडेकर,बबन धुमाळ,उत्तम सुरवसे,बळीराम थोरवे,राम वाडेकर,सोमिनाथ ढगे आणि ग्रामस्थानी केले आहे.

पंचक्रोशीतील धानोरा पुंडी पिंपळगाव,खुंटेफळ साबलखेड वाहिरा,कुंबेफळ,बाळेवाडी,पारोडी, सोलापूरवाडी,चिंचोली,कडा आदी श्रीराम भक्त भाविक नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन समस्त ग्रामस्थ पुंडी यांनी आवाहन केले आहे.

# महागाव येथे महिला दिनानिमित्त शिलाई मशीन व ब्युटी पार्लर किट वाटपाचा भव्य कार्यक्रम उत्साहात साजरा



**महागाव | (प्रतिनिधी)**

महिला सक्षमीकरणाला चालना देण्यासाठी जनसेवा फाउंडेशन आणि सक्षम फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने महिला दिनाचे औचित्य साधून शिलाई मशीन व ब्युटी पार्लर किट वाटपाचा भव्य कार्यक्रम फार मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

हा कार्यक्रम महागाव शहरातील सावित्रीबाई फुले कन्या विद्यालय येथे मोठ्या जल्लोषात पार पडला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महागाव नगरपंचायतीच्या माजी नगराध्यक्ष सौ. सुनंदा दिलीपराव कोपरकर या होत्या , तर उद्घाटन म्हणुन महागाव तहसील कार्यालयाचे तहसीलदार अभय मस्के यांच्या हस्ते करण्यात आले .

कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून नगराध्यक्ष रंजना दीपक आडे , महागाव शहरातील ज्येष्ठ नेते तथा महागाव तालुका जिनिंग प्रेसिंग चे अध्यक्ष संभाजीराव नरवाडे , उपाध्यक्ष प्रमोद भरवाडे , उमरखेड येथील समाजसेविका सरोज देशमुख , सविता चंद्रे , केवटे , नगरसेविका जयश्री संजय नरवाडे , महागाव नगरपंचायतचे नगरसेवक तथा काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष शैलेश कोपरकर , माजी जिल्हा परिषद सदस्य अनिल नरवाडे , महागाव नगरपंचायत च्या माजी नगरसेविका आशाताई सुनील भरवाडे , समाजसेविका शीलाताई सुरेश भरवाडे , महागाव तालुका खरेदी-विक्री संघाच्या संचालिका सीमाताई नितीन नरवाडे , महागाव तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष गणेश भोयर , महागाव तालुका मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष संजय कोपरकर , सुभाषराव शिंदे , यांच्या ज्येष्ठ पत्रकार गजानन वाघमारे तसेच संजय भगत , नगरसेविका सुरेखा विनोद कोपरकर , नगरसेविका करूना शिरबिरे, जान्हवी सुरोशे , यांची विशेष उपस्थिती होती .



कार्यक्रमात संजय भगत यांनी आपल्या मनोगतातून महिला सक्षमीकरणाचे महत्त्व अधोरेखित करत अल्प शब्दांत प्रभावी विचार मांडले. महिलांनी स्वावलंबी होण्यासाठी अशा उपक्रमांची गरज असल्याचे त्यांनी सांगितले .

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक जनार्दन सुरोशे यांनी केले. त्यांनी या उपक्रमामागील उद्देश स्पष्ट करत महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी अशा योजनांचे महत्त्व पटवून दिले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कोमल पाटील सोनटक्के यांनी प्रभावीपणे केले.

सदर कार्यक्रमाचे आयोजन महागाव शहरातील अक्षदा ब्युटी पार्लरच्या संचालिका पूनम विजय भरवाडे यांच्या पुढाकारातून करण्यात आले होते. त्यांच्या या सामाजिक उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

या कार्यक्रमासाठी महागाव शहरातील शेकडो महिलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवली. शिलाई मशीन व ब्युटी पार्लर किटचे वाटप करून महिलांना स्वावलंबनाचा नवा मार्ग उपलब्ध करून देण्यात आला.

एकूणच, महिला दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेला हा उपक्रम महागाव शहरात महिला सक्षमीकरणाचा प्रेरणादायी संदेश देणारा ठरला असून भविष्यातही अशा उपक्रमांची अपेक्षा व्यक्त होत आहे. या उपक्रमा अंतर्गत शहरातील बारा महिलांना शिलाई मशिन चे वाटप करण्यात आल्या आहेत त्यामध्ये प्रिती नरवाडे , ज्योशना नेवरे , शितल नरवाडे , शिल्पा कावळे , कीर्ती पाटे , आरती नेवारे , वैशाली गावंडे , दुर्गा कुसंगवर , अश्विनी नरवाडे , ऋतुजा पवार , प्राजक्ता नरवाडे , यांचा समावेश होता तसेच ब्युटीपार्लर किट करिता प्रियंका लोंढे , रिंकू बहादूरे , सुषमा चावतमळ, रुपाली कदम , वर्षा राठोड , वैष्णवी जाधव , नंदिनी कदम , कल्याणी कदम , यांची निवड करण्यात आली होती.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष प्रयत्न म्हणून महागाव शहरातील बाबाराव ठाकरे , अशोकराव कदम , नंदाताई रमेश कदम , सुजाता कोपरकर , मेघा नरवाडे , वैष्णवी कदम , संगीता कदम , संगीता भरवडे , विजय भरवाडे , प्रविण चिलकर यांच्यासह अनेकांनी अथक परिश्रम घेतले .

# माऊंट लिटरा झी स्कूलचा विद्यार्थी कार्तिक विजय मुंडे यांचे घवघवीत यश

**परळी/प्रतिनिधी –**

परळी येथील माऊंट लिटरा झी स्कूल च्या विद्यार्थ्यांनी यंदा विविध स्पर्धा परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश संपादन करून शाळेचा नावलौकिक वाढवला आहे.

शाळेतील विद्यार्थी कार्तिक विजय मुंडे याने एकाच वेळी तीन महत्त्वाच्या परीक्षांमध्ये यश मिळवत ‘हॅट-ट्रिक ऑफ सक्सेस’ साध्य केली आहे. त्याने राष्ट्रीय मिलिटरी स्कूल प्रवेश परीक्षा (RMS) मध्ये उत्तीर्ण होत आपली गुणवत्ता सिद्ध केली, तसेच अखिल भारतीय सैनिक शाळा प्रवेश परीक्षा (AISSEE) परीक्षेत यश मिळवले. याशिवाय त्याची निवड जवाहर नवोदय विद्यालय (JNV) मध्ये झाली आहे.

या तिहेरी यशामुळे कार्तिक मुंडे याचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. बीड जिल्ह्यातील विद्यार्थ्याने मिळवलेले हे यश इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.



शाळेचे अध्यक्ष डॉ. हरिश्चंद्र वंगे दादा, उपाध्यक्ष प्राध्यापक कैलास घुगे सर, प्राचार्य मंगेश काशीद सर प्राचार्य, शिक्षकवर्ग व पालकांनी कार्तिकचे अभिनंदन करत त्याच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी व सर्वांगीण विकासासाठी शाळा सातत्याने प्रयत्नशील असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

या यशामुळे माऊंट लिटरा झी स्कूल ची शैक्षणिक परंपरा अधिक बळकट झाली असून, भविष्यातही असेच यश मिळवत राहण्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

# श्रद्धेच्या आड दडलेले अंधश्रद्धेचे वास्तव : कायद्याची अंमलबजावणी आणि जबाबदारीचा प्रश्न

महाराष्ट्र ही सामाजिक प्रबोधनाची, विवेकनिष्ठ विचारांची आणि परिवर्तनवादी चळवळींची भूमी म्हणून देशात एक वेगळी ओळख निर्माण करून आहे. महाराष्ट्र राज्याच्या सामाजिक इतिहासात अंधश्रद्धा, जातिव्यवस्था, स्त्रीदमन आणि अन्याय यांविरुद्धचा लढा हा केवळ सैद्धांतिक न राहता प्रत्यक्ष कृतीतून उभा राहिलेला दिसतो.महात्मा ज्योतिराव फुले यांनी सत्यशोधक विचार मांडत समाजातील अज्ञानाला आव्हान दिले, सावित्रीबाई फुले यांनी स्त्रीशिक्षणाचा पाया घालत अंधश्रद्धा आणि स्त्रीदमनाला प्रत्यक्ष धक्का दिला, राजर्षी शाहू महाराज यांनी सामाजिक न्यायाच्या धोरणांद्वारे समतेचा मार्ग मोकळा केला, तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी वैज्ञानिक दृष्टिकोन, तर्कशुद्ध विचार आणि मानवी सन्मान या मूल्यांना घटनात्मक अधिष्ठान दिले. या वैचारिक परंपरेतूनच पुढे अंधश्रद्धेविरोधी चळवळी उभ्या राहिल्या आणि त्यातून महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन कायदा अस्तित्वात आला.

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन कायदा म्हणजे केवळ कायदेशीर चौकट नसून तो समाजाच्या विवेकनिष्ठतेचा आणि प्रबोधनपर भूमिकेचा पुरावा आहे. श्रद्धेच्या नावाखाली होणाऱ्या भोंदूगिरीला, फसवणुकीला आणि शोषणाला थांबवण्यासाठी हा कायदा अत्यंत महत्त्वाचा ठरतो. परंतु, वास्तवातील काही घटनांमुळे हा प्रश्न उभा राहतो की, कायदा असूनही अशा प्रकारच्या घटना का घडतात? विशेषतः महिलांचे श्रद्धेच्या नावाखाली होणारे लैंगिक शोषण हे केवळ गुन्हेगारी प्रकरण नसून ते समाजाच्या मानसिकतेवर, प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर आणि सत्तेच्या भूमिकेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण करते.

श्रद्धा आणि अंधश्रद्धा यामधील भेद समजून घेणे ही या चर्चेची पहिली पायरी आहे. श्रद्धा ही मानवी जीवनाचा सकारात्मक भाग आहे. ती व्यक्तीला मानसिक आधार देते, जीवनातील संकटांमध्ये धैर्य देते आणि नैतिक मूल्यांची जपणूक करते. परंतु, जेव्हा श्रद्धा विवेकशून्य बनते, प्रश्न विचारण्याची क्षमता हरवते आणि ती अंधानुकरणात परिवर्तित होते, तेव्हा ती अंधश्रद्धा बनते. अंधश्रद्धा ही व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर, विचारशक्तीवर आणि सन्मानावर आघात करते. ती अनेकदा भीती, असुरक्षितता आणि अज्ञान यांच्यापासून जन्म घेते आणि त्यातून शोषणाला खतपाणी मिळते.

अलीकडील काळात काही घटनांमध्ये श्रद्धेच्या नावाखाली महिलांचे लैंगिक शोषण झाल्याचे आरोप समोर आले आहेत. या घटना केवळ व्यक्तीगत गुन्ह्यांच्या चौकटीत मर्यादित नसून त्या समाजातील अंधश्रद्धेच्या खोलवर रुजलेल्या मानसिकतेचे प्रतीक आहेत. जेव्हा एखादी व्यक्ती स्वतःला दैवी शक्ती असलेली म्हणून सादर करते, चमत्कारांचे दावे करते आणि लोकांच्या समस्यांवर ‘दैवी उपाय’ सुचवते, तेव्हा काही लोक त्या व्यक्तीवर आंधळा विश्वास ठेवतात. या विश्वासाचा गैरफायदा घेत काही भोंदू लोक महिलांचे मानसिक, आर्थिक आणि लैंगिक शोषण करतात.

महिलांच्या संदर्भात अंधश्रद्धेचा प्रश्न अधिक गंभीर ठरतो. पितृसत्ताक समाजरचना, शिक्षणाचा अभाव, आर्थिक अवलंबित्व आणि सामाजिक दबाव यामुळे अनेक महिला अशा भोंदू व्यक्तींच्या जाळ्यात अडकतात. त्यांच्या वैयक्तिक समस्या; जसे की आरोग्याच्या अडचणी, कौटुंबिक ताणतणाव, संततीप्राप्तीचे प्रश्न यावर उपाय शोधताना त्या अशा लोकांकडे वळतात. हीच परिस्थिती शोषणाला कारणीभूत ठरते.

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन कायदा या कायद्याने अशा प्रकारच्या कृत्यांना स्पष्टपणे गुन्हा घोषित केले आहे. जादूटोणा, बुवाबाजी, खोटे चमत्कार, फसवणूक, तसेच शारीरिक आणि मानसिक छळ यांना या कायद्यात बंदी घालण्यात आली आहे. तरीही, अशा घटना घडत राहतात, याचा अर्थ कायद्याच्या अंमलबजावणीत गंभीर त्रुटी आहेत.

‘कायद्याची अंमलबजावणी कोणी करायची?’ हा प्रश्न येथे केंद्रस्थानी येतो. सैद्धांतिकदृष्ट्या, ही जबाबदारी पोलीस, प्रशासन आणि न्यायव्यवस्था यांच्यावर असते. परंतु, या यंत्रणा स्वतंत्र आणि निष्पक्ष असल्या पाहिजेत. जर त्यांच्यावर राजकीय दबाव असेल किंवा त्यांच्यात प्रामाणिकतेचा अभाव असेल, तर त्या प्रभावीपणे कार्य करू शकत नाहीत.

याठिकाणी सत्ताधाऱ्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. जर सत्तेतील काही लोकच अशा भोंदू व्यक्तींना संरक्षण देत असतील, त्यांच्याविरोधात कारवाई करण्यास टाळाटाळ करत असतील किंवा राजकीय फायद्यासाठी त्यांचा वापर करत असतील, तर ही परिस्थिती अत्यंत चिंताजनक ठरते. अशा वेळी केवळ कायद्याचा अपमान होत नाही, तर लोकशाही व्यवस्थेवरील विश्वासही ढासळतो.

‘याला जबाबदार कोण?’ या प्रश्नाचे उत्तर बहुआयामी आहे. सर्वप्रथम, जबाबदारी त्या व्यक्तीची आहे जी अंधश्रद्धेचा वापर करून शोषण करते. दुसरे म्हणजे, त्या यंत्रणांची जबाबदारी आहे ज्या अशा कृत्यांना रोखण्यात अपयशी ठरतात. तिसरे म्हणजे, सत्ताधाऱ्यांची जबाबदारी आहे, ज्यांनी कायद्याची निष्पक्ष अंमलबजावणी सुनिश्चित करणे अपेक्षित आहे. आणि शेवटी, समाजाचीही जबाबदारी आहे, जो अशा व्यक्तींना अंधश्रद्धेने पूजतो.

समाजातील अंधश्रद्धा ही केवळ अज्ञानामुळे निर्माण होत नाही. ती भीती, असुरक्षितता आणि आशेच्या शोधातूनही निर्माण होते. त्यामुळे, अंधश्रद्धा निर्मूलनासाठी केवळ कायदे पुरेसे नाहीत. समाजामध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन वाढवणे,



**डॉ. राजेंद्र बगाटे,**
**(समाजशास्त्राचे अभ्यासक)**

शिक्षणाचा प्रसार करणे आणि लोकांना तर्कशुद्ध विचार करण्याची सवय लावणे आवश्यक आहे.

महिलांच्या सशक्तीकरणालाही येथे विशेष महत्त्व आहे. शिक्षण, आर्थिक स्वावलंबन आणि सामाजिक जागरूकता यामुळे महिलांना अशा शोषणापासून वाचवता येऊ शकते. त्याचबरोबर, त्यांना योग्य मार्गदर्शन आणि आधार मिळवून देणेही आवश्यक आहे.

माध्यमांची भूमिका देखील अत्यंत महत्त्वाची आहे. माध्यमांनी अशा घटनांचा निष्पक्षपणे पर्दाफाश केला पाहिजे आणि समाजामध्ये जागरूकता निर्माण केली पाहिजे. सामाजिक संघटना आणि अंधश्रद्धा निर्मूलन चळवळींनीही अधिक सक्रिय भूमिका घेणे आवश्यक आहे.

शेवटी, हा प्रश्न केवळ कायद्याचा नाही, तर समाजाच्या आत्मपरीक्षणाचा आहे. आपण खरोखरच पुरोगामी आहोत का? की आपण अजूनही अंधश्रद्धेच्या जाळ्यात अडकलेले आहोत? जर श्रद्धेच्या नावाखाली शोषण होत असेल आणि आपण त्याकडे दुर्लक्ष करत असू, तर आपली पुरोगामी ओळख ही केवळ दिखावा ठरते.

महाराष्ट्राच्या प्रबोधनपर परंपरेला खऱ्या अर्थाने जपायचे असेल, तर केवळ कायदे बनवून चालणार नाही, तर त्यांची प्रभावी अंमलबजावणी, समाजामध्ये विवेकाची रुजवणूक आणि प्रत्येक नागरिकाने आपली जबाबदारी ओळखणे आवश्यक आहे. तेव्हाच अंधश्रद्धामुक्त, न्याय्य आणि खऱ्या अर्थाने पुरोगामी महाराष्ट्र घडू शकतो.